शासकीय सेवेत मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांची गा-हाणी/निवेदने यांचेवर विनाविलंब कार्यवाही करण्याबाबत, तसेच आरक्षण विषयक आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत.

शिस्तभंग विषयक कारवाई.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. बीसीसी-१०८६/५७३/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १२ ऑक्टोबर, १९९०.

पहा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०८६/५७३/१६-ब, दि. २ एप्रिल १९८६ व दिनांक २६ जून, १९९०.

परिपत्रक :- उपरोक्त शासन परिपत्रकान्वये शासनाने आदेश दिले आहेत की, मागासवर्गीयांच्या सेवाविषयक तक्रारी/गा-हाणी यांच्या संदर्भात मागासवर्ग कक्षांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय तातडीने व एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावेत. सदर माहिती १ महिन्याच्या आत पाठविण्यात आली नाही तर अशा प्रकरणी शासनात गंभीर दखल घेऊन संबंधितांविरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागेल असे म्हटले होते.

२. शासनाच्या निदर्शनास आले आहे की, शासनाने आरक्षण विषयक वेळोवेळी जे आदेश निर्गमित केले आहेत त्यांची काही कार्यालयांकडून नीटपणे अंमलबजावणी केली जात नाही व त्याकडे दुर्लक्ष करुन टाळाटाळ केली जाते. ह्या संबंधात विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीने नुकतीच शिफारस केली आहे की, आरक्षण विषयक आदेशांची अंमलबजावणी करण्यात जे अधिकारी दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा दाखवित असल्याचे आढळून आल्यास त्यांची शासनाने गंभीर दखल घ्यावी व संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी. सदरील शिफारशीच्या अनुषंगाने शासन असे आदेश देत आहे की, मागासवर्गीयांच्या आरक्षण [सरळसेवाभरती, बढती, ५०/१०० बिंदु नामावली लिहून काढणे, इत्यादी] बाबी संबंधात वेळोवेळी जे आदेश निर्गमित केलेले आहेत त्याचे संबंधित अधिका-यांनी काटेकोरपणे पालन करावे. सेवाविषयक बाबींच्या आदेशांबाबत कार्यवाही करण्यात दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा दाखविल्यास संबंधित अधिकारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील. तरी संबंधित सक्षम अधिका-याने शासकीय आदेशा प्रमाणे कार्यवाही न करणा-या त्यांच्या नियंत्रणाखालील अधिका-यांच्या विरुध्द नियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्याबाबत त्वरेने कार्यवाही करावी व त्याची माहिती [अहवाल] सामान्य प्रशासन विभाग/मागासवर्ग कक्षाकडे पाठवावी.

[कृ. मा. प.]

३. सर्व मंत्रालयीन विभाग/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. तसेच मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणा खालील निम-शासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, सहकारी संस्था, इत्यादींनाही वरील आदेशांप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित मंत्रालयीन विभागांनी निर्गमित कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

एम. ए. डी. साचियन,
प्रधान सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,
सर्व जिल्हा सेवायोजन अधिकारी,
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख.

* पत्राने.

---

T-३१[३५००-१०-९०]